# विद्युत निरीक्षणालय , उद्योग, ऊर्जा , कामगार व खनिकर्म विभाग,

## (FAQ) List

**प्रश्न-विद्युत निरीक्षण विभागाकडून कुठले काम पार पाडण्यात येते?**

विद्युत निरीक्षणे विभागाकडून विद्युत संच मांडणीचे निरीक्षणे , विद्युत अपघातांची चौकशी , उद्वाहनाचे निरीक्षणे , विद्युत संच मांडणे चालू करण्यास परवानगी , विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ती देणे, अनुज्ञप्ती नूतनीकरण, वायरमन तारतंत्री परवाना देणे तसेच वादग्रस्त प्रकरणांवर सुनावणी घेऊन त्यावर निर्णय देणे आणि विजेवरील कर वीज विक्रीकर आकारणी, आणि शासनाच्या निर्देशाप्रमाणे विद्युत शुल्कात सूट आणि परतावा देणे अशा प्रकारची कामे पार पाडण्यात येतात .

**विद्युत निरीक्षण विभागाकडून कुठल्या कायद्यांची अंमलबजावणी केली जाते?**

विद्युत निरीक्षण विभाग प्रामुख्याने विद्युत अधिनियम २००३, केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांनी बनविलेले विनियम २०२३, महाराष्ट्र वीज कर कायदा २०१६, विद्युत शुल्क नियम १९६२,वीज विक्रीकर कायदा-१९६३, वीज शुक्ल नियम -१९६२, उद्वाहन अधिनियम १९३९ आणि त्याखाली बनलेले उद्वाहन नियम १९५८, महाराष्ट्र सिनेमा अधिनियम , १९६६, महाराष्ट्र राज्जजूमार्ग अधिनियम १९५५, व त्याखाली तयार केलेले नियम, घरगुती वीज उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१,१९८८,१९८९,१९९३, व दर्जा नियंत्रण आदेश२००३, उपकरणे आदेश २००५, अधिसूचना यातील सूचनेप्रमाणे काम करते आणि त्याची अंमलबजावणी करते.

**विद्युत संच मांडण्याची निरीक्षणे कोणत्या प्रकारचे असतात?**

प्रामुख्याने विद्युत संच मांडणीचे नव्याने उभारण्यात आलेली विद्युत संच मांडणी आणि पूर्वीपासून अस्तित्वात असलेली विद्युत संच मांडणी निरीक्षण करणे तसेच एखाद्या कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेलल्या वीज संच मांडणीची निरीक्षणे अशा प्रकारचे विभागणी होते.

**प्रत्येक उभारणी केलेली किंवा पूर्वीपासून अस्तित्वात असलेली विद्युत संच मांडणीचे विद्युत निरीक्षण विभागाकडून निरीक्षण करून घेऊन त्याची परवानगी प्राप्त करून घेणे हे वीजपुरवठा कार किंवा ग्राहकावर बंधनकारक आहे काय?**

होय विद्युत अधिनियम २००३ आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांचे विनियम यातील तरतुदीनुसार प्रत्येक संच मांडणीचे निरीक्षण करून घेऊन ती विद्युतभारित करण्यापूर्वी संच मांडणी नोटिफाईड व्होल्टेज वरील असल्यास विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून करून घेणे किंवा नोटिफाईड व्होल्टेज खालील दाबाची वीज संच मांडणी असल्यास त्याच्या स्वयंप्रमाणीकरण सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांचे मार्फत तपासणी करून तसे विद्युत निरीक्षक कार्यालयास कळवून विद्युत भारीत करणे बंधनकारक आहे. मात्र ज्या वीज संच मांडण्या विद्युत अधिनियम २००३ च्या नियम ५४ खाली मोडतात अशा सर्व प्रकारच्या संच मांडण्यांना विद्युत निरीक्षक यांच्याकडून भारित करण्यापूर्वी परवानगी घेणे बंधनकारक आहे

**नोटिफाईड होल्टेज म्हणजे काय?**

केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांनी घोषित केल्याप्रमाणे विनियम ४५ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात ११ केव्ही हे नोटिफाईड व्होल्टेज घोषित करण्यात आले आहे. त्या विद्युत दाबावरील सर्व वीज संच मांडण्यांना विद्युत भारित करण्यापूर्वी विद्युत निरीक्षक यांच्याकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**सनदी विद्युत सुरक्षा अभियंता म्हणजे काय?**

केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासन यांनी निर्देशित केल्याप्रमाणे विद्युत निरीक्षण विभागाकडून परीक्षेद्वारे निवड केलेले अभियंते ज्यांची यादी विद्युत निरीक्षण विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ते सनदी विद्युत सुरक्षा अभियंता विद्युत ग्राहकास त्यांची वीज संच मांडणी स्वयंप्रमाणीकरण करण्यास मदत करतो.

**सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांच्याशिवाय एखादा वीज ग्राहक स्वत:ची संच मांडणी स्वयंप्रमाणीकरण करू शकतो का?**

नाही. सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांची मदत घेणे हे क्रमप्राप्त आहे.

**एखाद्या ग्राहकास ज्याचा विजेचा दाब नोटिफाईड होल्टेज खालील आहे असा ग्राहक थेट विद्युत निरीक्षक यांच्याकडून अर्ज करून वीज संच मांडणी ऊर्जायन करण्यास परवानगी घेऊ शकेल का?**

होय.

**पूर्वीपासून अस्तित्वात असलेली संच मांडणीस विद्युत निरीक्षक यांच्याकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे काय?**

होय. वरील प्रमाणे तरतुदीनुसार पूर्वीपासून असलेली प्रत्येक संच मांडणी ची नियतकालिक तपासणी विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून करून घेणे बंधनकारक आहे.

**विद्युत संच मांडणी तपासणी करता निरीक्षण शुल्क आकारले जाते का?**

सद्यस्थितीत नवीन किंवा पूर्वीपासून अस्तित्व असलेली वीज संच मांडणीच्या निरीक्षणावर शासनाकडून कुठलीही निरीक्षण शुल्क आकारले जात नाही.

**विद्युत अपघात झाल्यास कोणास कळवावे?**

विद्युत अपघात झाल्यास त्याची माहिती संबंधित पोलीस स्टेशन, संबंधित वीजपुरवठाकार कंपनी, विद्युत निरीक्षक आणि गरज असल्यास अग्निशामन विभागास(आग प्रकरणी) देण्यात यावी.

**विद्युत अपघात झाल्यास त्याची चौकशी झाल्यानंतर त्याचा अहवालाची प्रत कोणा कोणास मिळते ?**

विद्युत अपघाताची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याच्या अहवालाची प्रत पोलीस स्टेशन संबंधित वीज पुरवठा कार कंपनी यांना देण्यात येते.

**विद्युत अपघाताची नुकसान भरपाई ची जबाबदारी कोणाची असते?**

विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून चौकशी पूर्ण झाल्यानंतर नेमका विद्युत अपघात कोणामुळे झाला हे शोधून काढून त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याबाबतचे निर्देश संबंधित निरीक्षक किंवा जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर निश्चीत केली जाते.

**विद्युत संच मांडणीचे काम कोणाकडून करून घ्यावे?**

विद्युत संच मांडणीचे काम ते नवीन असो किंवा जुन्या विद्युत संच मांडणीत सुधारणा असो ते शासनमान्य विद्युत ठेकेदाराकडून करून घेणे बंधनकारक आहे.

**वादग्रस्त वीज प्रकरणांमध्ये न्याय मागण्यासाठी कुठे अर्ज करावा?**

वीज चोरी प्रकरणे जी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ अन्वये वीज पुरवठा कार कंपनीने केली असतील अशा प्रकरणांची सुनावणी विद्युत निरीक्षण विभागामार्फत घेतली जाते त्याकरिता अनुक्रमे ग्राहक लघुदाब, मध्यमदाब, उच्च दाब असल्यास त्याचे अपील विद्युत निरीक्षक, अधीक्षक अभियंता, मुख्य विद्युत निरीक्षक यांच्याकडे दाखल करता येऊ शकते.

**आरसीसीबी म्हणजे काय? त्याचा उपयोग कुठे होतो?**

आरसीसीबी म्हणजे रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर.
त्याचा उपयोग लिकेज करंट पासून बचाव करण्याकरिता होतो .

**एमसीबी म्हणजे?**

मिनीचर सर्किट ब्रेकर याचा उपयोग ओव्हर करंट आणि शॉर्टसर्किट यापासून बचाव करण्यासाठी होतो.

**आरसीसीबी आणि एमसीबी यापैकी एक बसवला तर चालेल काय?**

नाही. दोघांचे उपयोग आणि दोघांपासून मिळणारे संरक्षण वेगळे असल्याने दोन्ही बसवणे बंधनकारक आहे.

**आरसीसीबी बसवणे बंधनकारक आहे काय?**

होय. लिकेज करंट पासून होणाऱ्या विजेच्या धक्क्यापासून वाचण्याकरता आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने निर्देशित केल्यानुसार प्रत्येक वीज संच मांडणीस आरसीसीबी योग्य क्षमतेचा बसवणे बंधनकारक आहे

**हायरायीज परमिशन म्हणजे काय?**

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या विनियमातील तरतुदीनुसार १५ मीटर पेक्षा जास्त उंचीची इमारतीकरीता हायराइज परमिशन घेणे बंधनकारक आहे.

## विज कर (Electricity Duty) संबंधीचे प्रश्न (FAQ)

**विद्युत कर म्हणजे काय?**

विद्युत कर म्हणजे विज वापरावर शासनाकडून आकारण्यात येणारा कर होय, हा कर महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी ड्युटी ॲक्ट, २०१६ नुसार आकारला जातो.

**कोणावर विद्युत कर लागू होतो?**

राज्यातील सर्व वीज वापरकर्त्यांवर विद्युत कर लागू होतो. यात घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक समावेश होतो.

**विद्युत कराचे दर काय आहेत?**

दर वेगवेगळ्या वापर प्रकारावर अवलंबून असतात;
घरगुती वापरः १६%
वाणिज्यिक वापरः २१%
औद्योगिक वापरः ७.५%
शासकीय संस्था/सरकारी यंत्रणा यांना सूट लागू आहे.

**विद्युत कराची वसुली कोण करते?**

विज वितरण कंपन्या (जसे को MSEDCL. TATA Power, Adani Power) बिलामधून विद्युत कर वसूल करतात आणि शासनाकडे जमा करतात.

## उदवाहन (LIFT) संबंधीचे प्रश्न (FAQ)

**लिफ्ट चालवण्यासाठी परवाना आवश्यक आहे का?**

होय, कोणतीही लिफ्ट सुरू करण्यापूर्वी लिफ्ट परवाना (Lift License) घेणे बंधनकारक आहे. हे महाराष्ट्र लिफ्ट अधिनियम, १९३९ नुसार आवश्यक आहे.

**लिफ्ट बसवण्यापूर्वी कोणती परवानगी आवश्यक असते?**

१.Lift Installation Permission (NOC) विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून घ्यावी लागते.
२.स्थापत्य व स्थापनेचे आराखडे सादर करून पूर्वमान्यता आवश्यक आहे.
३.लिफ्ट बसवून झाल्यावर Inspection नंतरच Final License मिळतो.

**उदवाहनाचे प्रथम निरीक्षण करणे बंधनकारक आहे काय**?

होय. उद्वाहन कायदा १९३९, व २०१७ व नियम १९५८ नुसार

**लिफ्टची तपासणी किती वेळेस होते**?

लिफ्टची वार्षिक तपासणी (Annual Inspection) संबंधीत जिल्हयाचे विद्युत निरीक्षक (Electrical Inspector) यांच्याकडून केली जाते. तपासणीसाठी वार्षिक फी शासनास जमा करणे व अर्ज आवश्यक आहे.

**लिफ्टमध्ये अपघात झाला तर काय करावे?**

अपघाताची लिखित माहिती विद्युत निरीक्षक (Electrical Inspector) यांना 24 तासात द्यावी.
लिफ्ट वापर तात्पुरता बंद करून तपासणी होईपर्यंत थांबावे.

**लिफ्ट देखभाल कोण करते**?

लिफ्टची नियमित देखभाल AMC (Annual Maintenance Contract) अंतर्गत लिफ्ट निर्माता कंपनी किवा परवानाधारक मान्यताप्राप्त उद्वाहन ठेकेदारकडून केली पाहिजे. देखभाल दुरूस्ती रजिस्टरमध्ये प्रत्येक तपासणीची नोंद ठेवावी लागते.

**उद्वाहन निरीक्षणाकरीता निरीक्षण शुल्क आकारले जाते का?**

होय. उदवाहनाच्या प्रकारानुसार नवीन आणि पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या उदवाहनाच्या निरीक्षणावर निरीक्षण शुल्क आकारले जाते.

**उदव्हान निरीक्षण शुल्क कोठे आणि कसे भरावे?**

निरीक्षण शुल्क हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रास GRAS प्रणाली द्वारे ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावे.